# सापळा केस

दिनांक ०९/०३/२०२१

**आलोसे सचिन विष्णु सरोदे वय ३१ वर्षे व्यवसाय तलाठी सज्जा आरखेड ता.पालम यांनी ३,०००/- रू लाचेची मागणी करून स्वत: स्विकारली वरून यशस्वी सापळा कार्यवाही केस**

यातील तक्रारदार यांनी अॅसीबी कार्यालय परभणी येथे दि.०९.०३.२०२१ रोजी तक्रार दिली की, मौजे शेत शिवार सायळा येथे तक्रारदार यांचे नावावर ०६ एकर १३ गुंठे जमीन आहे. सदर जमीनीपैकी ०३ एकर १० गुंठे जमीन त्यांची पत्नीचे नावावर करावयाची आहे. त्यासाठी तक्रारदार यांनी दि. २४/०२/२०२१ रोजी तलाठी सज्जा आरखेड चे तलाठी श्री. सरवदे यांचेकडे एक शंभर रूपयाचा बॉन्डपेपर व दोन साक्षीदार व वकीलांसमक्ष नोटरी केलेली असे संपुर्ण कागदपत्र दिले असता त्यांनी तक्रारदार यांना या कामासाठी ६०००/- रू खर्च येईल असे सांगीतल्याने त्यांनी त्यादिवशी ६०००/- तलाठी सरोदे यांनद दिले होते.परंतु अद्यापही तक्रारदार यांचे काम न झालेने त्यांनी काल दि. ०८/०३/२०२१ रोजी तलाठी श्री. सरवदे यांची भेट घेवून त्यांचे कामाबाबत विचारपुस केली असता त्यांनी तक्रारदार यांना ०३ एकर १० गुंठे जमीन त्यांची पत्नी च्या नावावर करण्यासाठी आणखी पैसे द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली आहे. तलाठी सरोदे हे लाचेची मागणी करीत असुन त्यांना लाच देण्याची ईच्छा नसुन तलाठी सरोदे यांचे वर योग्य ती कार्यवाही करावी. अशी तक्रार दिली

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांच्याकडुन दि.०९.०३.२०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणी बाबत पडताळणी केली असता तलाठी सचिन सरोदे यांनी ३०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून तक्रारदार यांना दि.०९.०३.२०२१ रोजी आरोपी लोकसेवक सचिन सरोदे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी पाठविले असता आरोपी लोकसेवक सचिन सरोदे यांनी पंचासमक्ष ३०००/- रूपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली. आलोसे सचिन सरोदे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन पालम येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक अमोल कडु , लाप्रवि परभणी हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोना/कुलकर्णी , पोशि/ सचिन धबडगे, पोशि/शेख मुक्तार,पोह/जहागीरदार, पोह/हनुमंते, पोना/कटारे, पोना/शेख मुखीद, पोशि/चटटे, मपोशि/दंडवते, मपोशि/टेहरे, चापोना/कदम, चापोह/चौधरी, अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा-या कारवाईबाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२-२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५

श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षकला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ९६६५४७९३३३

श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी – ७०२१००२११०

श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी – ८०८७०७२९१९

Scanned with CamScanner